International Journal of Advance and Applied Research (IJAAR) ISSN – 2347-7075
Peer Reviewed Bi-Monthly Impact Factor – 0.899
Vol.2 No.3 Jan - Feb 2015

# शिरोळ तालुक्यातील अनुसुचित जातीच्या अर्थिक विकासासाठीच्या शासकिय योजनांचा अभ्यास (विशेष संदर्भात; कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजना तसेच पॉवर टिलर योजना)

मोहन रमेश कांबळे

**प्रस्तावना** —

१५ ऑगष्ट, १९४७ रोजी भारत देश ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त होउन स्वतंत्र झाला. त्यानंतर २६ जानेवारी, १९५० साली भारतीय समाज एकसंघ घडविण्यासाठी राज्यघटनेचा भारत देशात अंमल सुरू झाला. भारतीय राज्यघटनेने समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय ही पायाभूत तत्वे स्वीकारली. त्याचप्रमाणे भारतीय संविधानाने विशाल भूप्रदेश व लोकसंख्या असलेल्या अनिवार्य असलेल्या संसदीय लोकशाही पध्दतीचा स्वीकार केला. भारतीय समाज हा विषमतेने भरलेला असून विविध जातीधर्मांनी मिळून बनलेला आहे. त्यामुळे येथे सामाजिक न्याय प्रस्तापित करणे हे महत्वाचे उद्दिष्ट देशासमोर होते. म्हणूनच भारतीय राज्यघटनेचे गाढे अभ्यासक सर ग्रॅनव्हिल ऑस्टीन असे म्हणतात की, 'भारतीय राज्यघटना ही सामाजिक क्रांतीचा एक दस्तऐवज आहे.'

**सामाजिक न्याय व समता** —

सामाजिक न्यायाच्या पार्श्वभूमी संदर्भात भारताच्या प्राचीन इतिहासाचा आढावा घेता असे लक्षात येते की, भारतात 'आर्य – अनार्य' संघर्ष घडून आलेला दिसून येतो. भारतात मूळनिवासी लोक म्हणून द्रविडीयन समाजाचा उल्लेख आढळतो. ऋग्वेदामध्ये असे म्हटले आहे की, द्रविडीयन अनार्यांना युध्दामध्ये हरवून त्यांना दास (गुलाम) बनविणेत आले व आर्यलोक हे जमीनीचे मालक झाले. व त्यांना जाती– वर्णाच्या व्यवस्थेत अडकवून त्यांना सामाजिक न्यायापासून वंचित ठेवण्यात आले. त्यामूळे मूळचे लोक हे भूमीहीन झाले व आपले जीवन गुलामी करून जगू लागले. त्याचप्रमाणे त्यांना मुलभूत गरजांपासून वंचित ठेवून गावापासून बाहेर ठेवणेत आले. असे विवेचन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शूद्र पूर्वी कोण होते? या प्रसिध्द ग्रंथात केलेले आढळते. भारताच्या स्वातंत्र्यपूर्व कालखंडात आणि नंतर फुले, शाहू, आंबेडकर यांनी सामाजिक न्याय प्रस्थापनेची चळवळ सुर केली. महात्मा फुलेंनी सन १९४८ साली अस्पृश्यांसाठी शिक्षणाचा आग्रह धरला व शाळा काढल्या. राजर्षी शाहू महाराजांनी १९०२ मध्ये मागासवर्गीयांना नोक—यात ५० : आरक्षण देऊन सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी प्रयत्न केले. म्हणूनच त्यांना 'सामाजिक न्यायाचे जनक' असे म्हटले जाते. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारताचे संविधान निर्माण करुन देशात सामाजिक न्यायाची क्रांती केली.

भारतीय समाजातील वंचितांच्या मुलभूत प्रश्नांपैकी 'जमीन धारणा' हा एक मुलभूत प्रश्न आहे. म्हणूनच त्या संबंधीचे कायदे शासनाकडून केले गेले आहेत. भारतात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी या वंचित शोषित समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी खूप मोठा लढा लढलेला दिसून येतो. त्यामध्ये पहिला सत्याग्रह १९, २० मार्च १९२७ रोजी झाला. हा सत्याग्रह अस्पृश्याच्या मानवी हक्कसाठीचा होता. यावेळी अध्यक्षीय भाषणात ते असे म्हणाले कि, 'दुसरा धंदा मी जो आपणास सुचविला आहे तो शेती होय. हा धंदा सुचविण्यात माझा हेतू हा आहे की,

आपल्या अस्पृश्य वर्गांनी आर्थिकदृष्टया स्वतंत्र रितीने जीवित घालविण्याची व्यवस्था करावी. शेती विकत घेणे हे अस्पृश्य लोकांना कदाचित कठिण जाईल. पण जंगल खात्याच्या कितीतरी पडीक जमीनी आहेत. त्यांना जर एखादया अस्पृश्य वर्गाच्या माणसाने मागणी केली तर त्याला त्या मिळण्यासारख्या आहेत'. अशा प्रकारचे मार्गदर्शन त्यांनी अस्पृश्य समाजाला केले होते. त्यांच्या या लढयामध्ये कर्मवीर दादासाहेब गायकवाडांचा सहभाग अग्रणी असलेला दिसून येतो. ठाणे जिल्हयातील कासारा या ठिकाणी भरलेल्या परिषदेमध्ये भाषण करताना डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या जमीन, मालकी संबंधित आढावा घेताना असे म्हटले की, 'महारांना जमीनी नाहीत याचे कारण त्या इतर लोकांनी घेतल्या म्हणून, अस्पृश्यांना नोक—या नाहीत कारण त्या इतरांनी लुबाडल्या म्हणून, दैवावर भरवसा ठेवून वागू नका, जे काम करावयाचे असेल ते आपल्या मनगटाच्या जोरावर करा' अशा प्रकारच्या मार्गदर्शनातून त्यांनी या सामाजात आत्मसन्मान जागा केला व स्वाभीमानाने जगण्याचा आदर्श घालून दिला. स्टेट्स ॲन्ड मायनॉरिटीज हा ग्रंथ लिहून तर त्यांनी शेतजमीनीच्या राष्ट्रीयीकरणची मागणी केलेली दिसून येते. त्यांचे जवळचे सहकारी मित्र कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनीही सन १९६४ मध्ये भूमीहीनांचे देशव्यापी आंदोलन करून सामाजिक न्यायाचा लढा लढला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजात समता प्रस्तापित व्हावी या दृष्टीने प्रयत्न केलेले दिसून येतात.

**सामाजिक न्यायाचे धोरण। — ऐतिहासिक आढावा**

भारतीय संविधानाच्या सरनाम्यालाच भारतीय राज्यटनेचा आत्मा असे संबोधले जाते. कारण त्यामध्ये 'सामाजिक न्याय व समता' ही तत्वे अंतर्भूत करण्यात आलेली आहेत. म्हणून न्याय म्हणजे सामाजातील वंचित शोषित इत्यादींना समान संधी व दर्जाची समानता बहाल करणेत आलेली आहे. कारण भारतीय समाजव्यवस्थेने हजारो वर्षे बहुसंख्य समाजघटकांना सामाजिक न्याय नाकारलेला होता. त्यासाठी जातीधर्माची उतरंड व समाजव्यवस्था नष्ट करून त्या जागी समतेवर आधारित नवसमाजाची उभारणी करणे हे मुख्य उद्दिष्ट सामाजिक न्यायाचा एक भाग मानला गेला आहे.

घटनात्मकरीत्या भूमी हा विषय भारतीय संविधानाच्या राज्यसूचित आहे. तसेच भारतीय संविधानाच्या 'कलम ४६ अन्वये' घटक राज्य हे अनुसूचित जाती जमाती व इतर दुर्बल घटकांच्या आर्थिक व शैक्षणिक विकासाला हातभार लागेल यासाठीचा प्रयत्न करेल. त्यानुसार पूर्वी अस्पृश्य म्हणून ओळखल्या जाणा—या जातींना भारतीय संविधानानुसार अनुसूचित जातीत समाविष्ठ करणेत आलेले आहे. त्यामुळे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश। सुधारणा कायदा १९७६ कायदयान्वये ५९ जातींना ओळखले जाते. अनूसूचित जातीच्या आर्थिक व शैक्षणिक विकासाला शासनाकडून मदत होताना दिसते. त्यासाठी शासन अनेक कल्याणकारी योजना राबवून या घटकाला सेवा सवलती उपलब्ध करून देते. सध्या १९९३ च्या उन्निकृष्णन खटल्याने घटनेच्या कलम २१ ची व्याप्ती वाढवून जगण्याच्या हक्कात शिक्षणाचा हक्कही समाविष्ट केला. त्यामुळे माणुस म्हणून प्रतिष्ठापूर्वक जगण्याचा हक्क हा मुलभूत अधिकार बनला. त्या अनुषंगाने भारत देशात केंद्र व राज्य शासनाकडून अनेक माध्यमातून प्रयत्न होताना दिसतात. सन १९७१ मध्ये स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या सरकारने २० कलमी कार्यक्रमाव्दारे भूमीहीनांना जमीन वाटपाचा कार्यक्रम हाती घेतला होता.

. सन १९४१ मध्ये विनोबा भावेंनी भूदान चळवळ ही केली होती. या आंदोलनातून भूमीहीनांचा प्रश्न ऐरणीवर आला हे लक्षात येते. भारतात उत्तरप्रदेश राज्यात बहुजन समाज पार्टीच्या सरकारने या घटकातील भूमीहीनांना जमीनी वाटप करून मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न ही केलेला दिसून येतो. त्यानंतर महाराष्ट्रात सन २००४ पासून अनुसूचित जाती व नवबौध्द

घटकातील दारिद्रय रेषेखालील भूमीहीन शेतमजूरांना शेतजमीनी वाटप करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला दिसून येतो. मानवी जीवनात शेतीला अनन्य साधारण महत्व आहे. त्यामूळे जमीन हे केवळ वास्तव्य करण्याचे किंवा उत्पादनाचे साधन नाही तर ती एक मातृभूमी ही आहे. त्यामूळे भूमीहीन म्हणजे सर्वसाधारणपणे असे लोक की, ज्यांना स्वत:च्या मालकीची जमीन किंवा जागा नसणे. अशी व्याख्या करता येईल. महाराष्ट्र राज्य सरकारने सरकारी मालकीच्या गायरान किंवा पडसर अतिरिक्त निघालेल्या जमीनी वाटप केल्या मात्र पूढे दिर्घकाळ काही घडले नाही तथापि आंदोलने ही थांबली नाहीत. 'नांगर खुपसा, नांगर उपसा' चळवळीने जमीन बळकाविण्याचे प्रयत्न हे चालूच ठेवले होते. याची परिणीती म्हणून महाराष्ट्र सरकारने दखल घेवून सदरहू योजना कार्यान्वित केल्याचे आढळून आले. उदारीकरणानंतर विशेष जमीनी खाजगी उदयोगांनी संपादित केल्या गेल्या. त्यामूळे शेतक—यांना आंदोलने करावी लागली. महाराष्ट्र राज्यात सन २००४ साली तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठी महत्वकांक्षी निर्णय घेतला व सदर योजना आस्तित्वात आली.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रयरेषेखालील भूमीहीनांसाठीच्या आर्थिक विकासात भर घालण्या—या या योजनेला 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजना' असे नांव दिले असल्यामुळे सर्वप्रथम दादासाहेब गायकवाडांनी दिलेल्या योगदानाचा आढावा घेणे उपयुक्त ठरेल ते पुढील मुद्दयांच्या आधारे ते स्पष्ट करता येईल.

**कर्मवीर दादासाहेब गायकवाड जीवन परिचय : प्रभाव व कार्य**

नाशिकचा "भावडया" म्हणून ओळखले जाणारे भाऊराव कृष्णराव गायकवाड यांचा जन्म नाशिकपासून १२ मैल अंतरावर असलेल्या 'आंबे—दिंडोरी' या खेडेगावात १५ ऑक्टोबर १९०२ रोजी एका दलित शेतकरी कुटुंबात झाला. वडील कृष्णराव व आई पवळाबाई यांना पहिल्यांदा रंभाबाई, येसुबाई, ठकुबाई अशा मुली झाल्या व शेवटी भाऊरावांचा जन्म झाला. भाऊराव इयत्ता ३ रीत असताना नाशिक येथील रखमाजी बापूराव दाणी यांची मुलगी सीता वय ७ वर्षे हिच्याशी ११ एप्रिल १९१२ मध्ये लग्न झाले दादासाहेबांचे शिक्षण हे कसेतरी मॅट्रीकपर्यंत झालेनंतर त्यांना प्लेगचा रोग झाला व त्यांचे शिक्षण मध्येच बंद झाले, मुलांअभावी त्याची दोन लग्ने झाली आयुष्यभरात त्यांनी अनेक विविध पदांवरती कामे केली. तसेच घरी शेती ही करित असत. नाशिक जिल्हयात घारपु—यात नव्यानेच सुरू झालेले श्री शाहू छत्रपती बोर्डीगंचे सुप्रिटेंडेट म्हणून ही त्यांनी काही वर्षे नोकरी करीत असताना सरकारवाडयाच्या सार्वजनिक वाचनालयात जावून मार्क्स, लेनीन, एगंल, गांधी, रूसो, व्हॉल्टेअर, एडमंड बर्क, जेफरसन, थॉमस पेन या उदारमतवादी विचारवंताचे ग्रंथ ते वाचत असत. त्यामूळे त्यांच्या वरती उदारमतवादी विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

डॉ. आंबेडकर कोर्टाच्या एका केसच्या कामानिमीत्त नाशिकला गेले होते. तिथेच त्यांची भेट दादासाहेब गायकवाड यांच्याशी झालेली होती. डॉ. आंबेडकर हे दलित, शोषित पिडीत लोकांच्या न्याय हक्कासाठी लढत आहेत हे त्यांना माहित झाले होते. दादासाहेबांना त्यांचे विचार पटले व ते चळवळीत सामील झाले. तिथूनच ख—या अर्थाने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. दादासाहेब हे डॉ. आंबेडकरांच्या अगदी जवळचे सहकारी होते. डॉ. आंबेडकर तर त्यांचा उल्लेख आपला 'उजवा हात' म्हणून करित असत. दिनांक ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर त्याचा विचार दादासाहेब गायकवाड यांनी जिवंत ठेवला. दादासाहेब व त्यांच्या सहका—यांनी मिळून रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. दिनांक ३० सप्टेबर १९६४ ला पक्षाच्या कार्यकारणीच्या सभेत दादासाहेब गायकवाड यांना पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. दिनांक ६ डिंसेबर १९६४ मध्ये सर्व जातीतील भूमीहीन लोकांकरीता शासनाकडून जमीनी मिळाव्यात यासाठी त्यांनी प्रचंड मोठा

सत्याग्रह केला होता. त्यामध्ये तब्बल तीन लाख भूमीहीन शेतकरी सामील झाले होते. अशा रितीने दादासाहेब गायकवाड याचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय कार्याची दखल घेवून भारत सरकारने ‘पद्मश्री’ हा बहुमानाचा किताब राष्ट्रपती झाकीर हुसेन यांचे हस्ते १६ एप्रिल १९६८ रोजी दिला. अशा प्रकारे दादासाहेब गायकवाड आयुष्यभर वंचित, शोषित लोकासाठीच लढले. म्हणून त्यांना कर्मवीर म्हणून ओळखले गेले. त्यांचे निर्वाण २९ डिसेंबर १९७१ रोजी विलीग्टन रुग्णालयात नवी दिल्ली येथे झाले. नाशिक येथील गोदावरी नदीवरील गंगा घाटावर त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले. दादासाहेबांचा हा लढा लक्षात घेवूनच महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नावाची योजना सुरू करण्याचे प्रयोजन केले.

**कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजनेचे स्वरूप :—**

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० साली झाली. महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे राज्य म्हणून ओळखले जाते. भारतीय राज्यघटनेच्या ‘कलम ४६ नुसार’ सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीची सुरूवात करणेत आली. सामाजिक न्याय हे उदिद्ष्टये संविधानाच्या प्रतिज्ञापत्रकात तसेच मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वे यात समाविष्ठ आहे. भारतीय नवसमाजाची उभारणी ही सामाजिक व आर्थिक न्यायावरती आधारलेली आहे. ही जाणीव स्वातंन्त्र्य चळवळी पासून भारतीय जनतेत दृढमूल झाली. मालमत्तेचे वाटप न्याय पध्दतीने व्हावे, उत्पादनाची साधने फक्त थोडया लोकांच्या हाती राहू नयेत. सर्वांना समान वेतन मिळावे, स्त्रीया व मूले हयांचे हितसंबंध सुरक्षित रहावेत व वंचित, शोषित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याच्या हेतूने ही धोरणे शासनाकडून आखण्यात आली आहेत. तसेच सामाजिक व आर्थिक विषमता कमी व्हावी ही शासनाची त्यामागची भूमिका आहे. अशा उदद्ेश्यातून महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २००४ पासून ‘कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजना’ कार्यान्वित करणेत आली आहे. सदर योजनेतून अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रयरेषेखालील भूमीहीन शेतमजूरांना चार एकर कोरडवाहू किंवा दोन एकर बागायती जमीन देण्यात येते.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या २६५ कल्याणकारी योजना आहेत. त्यामध्ये सुरूवातीला महाराष्ट्र शासनाने सदरहू योजना ‘अनुसूचित जाती व नवबौध्दांच्यासाठीची सबळीकरण व स्वाभीमान योजना’ या नावाने सुरू केलेली होती. त्यानंतर १४ जानेवारी २००५ च्या शासन निर्णयानुसार तिचे नामकरण ‘कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजना’ असे सुधारित करण्यात आले. दादासाहेब गायकवाड यांचे कार्य लक्षात घेवूनच महाराष्ट्र शासनाने सदर योजनेला त्यांचे नांव दिल्याचे दिसून येते.

**अ ) कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजनेची शासनाने निर्धारित केलेली उदिद्ष्टे :—**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजना ही प्रामुख्याने महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रयरेषेखालील लोकांसाठी राबविण्यात येते त्यामूळे सदर योजनेची शासनाने निर्धारित केलेली उदिद्ष्टये खालील प्रमाणे आहेत —

१. अनुसूचित जाती नवबौध्द घटकातील दारिद्रयरेषेखालील लोकांचे बेरोजगारीचे प्रमाण कमी करणे.
२. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्ररेषेखालील उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देवून त्यांना दारिद्रयरेषेच्यावरती आणणे.
३. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रयरेषेखालील लोकांचा आर्थिक दर्जा सुधारणे अशी ठरविण्यात आली आहेत.

**ब) सदर योजनेच्या अटिशर्ती :—**

सदरहू योजनेसाठीच्या शासननिर्णय दिनांक २ जून २००४ नुसार काही अटिशर्ती निर्धारित केलेल्या आहेत. त्यातील प्रमुख काही अटी पुढील प्रमाणे अशाप्रकारच्या आहेत.

१. सदरच्या योजनेकरिता लाभार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील असावा.
२. अर्जदार हा दारिद्रयरेषेखालील भूमीहिन शेतमजूर असावा.(त्यामध्ये विधवा, परितक्त्या स्त्रीयांना प्राध्यान्य देण्यात आले आहे.)
३. लाभार्थ्याची वयोमर्यादा १८ ते ६० वर्षापर्यंत असेल
४. जमीन उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून ५० टक्के अनुदान व ५० टक्के बिनव्याजी कर्ज या स्वरूपात निधी उपलब्ध करून दिला जातो.
५. सदर योजनेकरिता लाभार्थी निवडीचा संबंधित गावाच्या गावसभेकडून बहूमताने मंजूर झालेला ग्रामपंचायत ठरावाची आवश्यकता असते.
६. अशाप्रकारे अर्जदाराने सर्व अटीशर्ती पूर्ण करून विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित जिल्हयाचे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडे करावा लागतो.

**क ) लाभार्थी गटाची ओळख —**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजनेकरीता पात्र म्हणून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रयरेषेखालील लोकांना पात्र ठरविणेत आले आहे. महाराष्ट्रात अनुसूचित जाती अधिनियम १९७६ नुसार, ५९ जाती या घटकात गणल्या जातात.

**ड) सदरहू योजनेचा लाभाचे स्वरूप :—**

सदर योजनेतून अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रयरेषेखालील भूमीहीन शेतमजूरांना चार एकर कोरडवाहू किंवा दोन एकर बागायती जमीन देण्यात येते. (सदर योजनेच्या अटी शर्ती व तरतूदी सविस्तर माहितीची चिकित्सा मीमांसा व मांडणी पुढील प्रकरण। परत्वे करण्यात आलेली आहे.)

**पॉवर टिलर वाटप योजनेचे स्वरूप :—**

सन २००८ पासून महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील अल्पभूधारक शेतक—यांसाठी पॉवर टिलर वाटप योजना सन २००८ पासून सुरु करण्यात आलेली आहे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील अल्पभूधारक शेतक—यांना १०० टक्के अनुदानावर पॉवर टिलर पूरवठा करण्याची योजना महाराष्ट्र शासनाकडून सुरू करण्यात आली आहे. पॉवर टिलर हा शेती कसण्याकरीता लाभार्थ्यांना दिला जातो. सदर योजनेच्या शासनाने घालून दिलेल्या अटी शर्ती व शिरोळ तालुक्यातील अंमलबजावणी संबधीचा अभ्यास सविस्तर व विश्लेषण। प्रकरण। परत्वे केला गेला आहे.

**अ) पॉवर टिलर योजनेची उदिद्ष्टये :—**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील अल्पभूधारक शेतक—याला जमीन कसण्याकरीता रूपये २० ते २५,००० ची बैलजोडी खरेदी करून बैलगाडीचे संगोपन व तिच्या देखभालीसाठीचा खर्च करणे आर्थिकदृष्टया परवडण। शक्य नाही. तेंव्हा अशा शेतक—यांना किफायतशीररीत्या शेती करण्यासाठी १०० टक्के अनुदानावर पॉवर टिलरची योजना महाराष्ट् शासनाकडून कार्यान्वित करण्यात आलेली आहे. यातून शेतक—यांच्या उत्पन्नात वाढ करता येईल. यासाठीचा प्रयत्न शासनाकडून केले गेल्याचे दिसून येते. त्यामूळे शासनाचा हेतू साध्य झाला किंवा कसे? ते पाहण्यासाठी हा अभ्यास महत्वपूर्ण ठरतो.

सदरहू योजना महाराष्ट्र शासनाच्या त्रिस्तरीय यंत्रणेकडून राबविण्यात आलेली असल्यामूळे या योजनेचा अभ्यास विकास प्रशासनाच्या अंगान करण्यास महत्वपूर्ण ठरते.

**ब) लाभार्थी गटाची ओळख —**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजनेकरीता पात्र म्हणून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील अल्पभूधारक शेतक—याला पात्र ठरविणेत आले आहे. महाराष्ट्रात अनुसूचित जाती अधिनियम १९७६ नुसार, ५९ जाती या घटकात गणल्या जातात.

**क) लाभाचे स्वरूप —**

सदरच्या योजनेतून दिला जाणारा पॉवर टिलर हा १०० टक्के अनुदानातून दिला जातो. त्यामूळे सदरहू योजना या घटकातील लोकांसाठी पूर्णपणे मोफत राबविण्यात येते. तसेच अल्पभूधारक शेती शिवाय अन्य कोणतेही निकष नसल्याचे आढळून येते.

**ड) शासनाने घालून दिलेल्या अटिशर्ती —**

सदरची योजना ही आर्थिकदृष्टया कमकुवत असणा—या विशिष्ट वर्गासाठी राबविण्यात येत असल्याने त्यासाठी काही अटीशर्ती शासनाकडून घालून दिल्या आहेत त्या पुढील प्रमाणे.

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. अर्जदार हा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील असावा.
३. अर्जदार हा अल्पभूधारक किंवा कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजनेचा लाभार्थी असावा.
४. तसेच अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ४० हजार रू पेक्षा जास्त नसावे.

वरील प्रमाणे पात्र लाभार्थी वर्गाला शासनाने अटीशर्ती घालून दिलेल्या आहेत.

**१.७ विकास प्रशासन :—**

जगामध्ये भारत देश हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. त्यामुळे इथल्या लोकांचा मुख्य व्यवसाय “शेती” हाच आहे. त्याचप्रमाणे भारतीय अर्थव्यवस्था ही शेतीच्या विकासावरती अवलंबून आहे. त्या अनुषंगाने शासन व प्रशासनाला आपली ध्येयधोरणे आखावी लागतात. शेतीच्या विकासामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात मोलाची भर पडते. त्यामूळे शासन देशातील पडीक जमीनीला ओलिताखाली आणून जमीन सुधारणा कायदयाअंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाला (भुमीहीन) ती वाटप केले जाते. “सर्वसाधारपणे विकास प्रशासनात विकास म्हणजे आर्थिक विकास आणि आर्थिक वृध्दी होय” अशी व्याख्या करण्यात येते. विकास समान पध्दतीची निर्मिती करून प्रगतशील समाजव्यवस्था स्थापित केली जाते. सर्वसामान्य आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लोकांच्या मुलभूत गरजांची पुर्तता केली जाते. विकासाचा मुख्य उद्देश मानव हाच असल्यामुळे मानवाला चांगले जीवन जगता यावे म्हणून शासन प्रयत्न करीत असते.

**जिल्हा समिती जबाबदारी अधिकारी क्षेत्र व कार्यपध्दती —**

**जिल्हास्तरीय समिती सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे —**

१. मा. जिल्हाधिकारी ( जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर) — अध्यक्ष
२. मा. संचालक (समाजकल्याण कार्यालय, पुणे) — सदस्य
३. मा. मुख्यकार्यकारीअधिकारी (जिल्हा परिषद, कोल्हापूर) — सदस्य
४. जिल्हा भूमीअभिलेख अधिकारी (जिल्हा भूमिअभिलेख कार्यालय, कोल्हापूर) — सदस्य
५. सहनिबंधक (नोंदणी शुल्क व मुल्यांकन कार्यालय, कोल्हापूर)— सदस्य
६. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, कोल्हापूर)— सदस्य,(सचिव)

सदरहू योजनेच्या अंमलबजावणीकरिता 'जिल्हासमितीला' माहिती संचालक, समाजकल्याण, पूणे यांचेकडून मार्गदर्शन केले जाते. सदर योजनेच्या यांचेकडून मार्गदर्शन केले जाते. सदर योजनेच्या अंतीम प्रस्तावला मान्यता देण्यापासून या योजनेअंतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेला निधी संचालक, समाज कल्याण, पूणे यांचेमार्फत वितरण केला जातो. सदर योजनेचे सनियंत्रण समाजकल्याण, पूणे या विभागामार्फत करणेत येते. यांचेकडून दर तीन महिन्यांनी योजनेचा अहवाल शासनाकडे पाठविला जातो.

**उपसमिती जबाबदारी, अधिकारक्षेत्र व कार्यपध्दती :—**

**तालुकास्तरीय समिती सदस्यांची नावे पुढील प्रमाणे,**

१) मा. उपविभागीय अधिकारी (प्रांत कार्यालय, इंचलकरंजी) — अध्यक्ष
२) मा. तहसिलदार (तहसिलदार कार्यालय, शिरोळ) — सदस्य
३) मा. निरिक्षक ( भूमिअभिलेख कार्यालय, शिरोळ) — सदस्य
४) मा. मंडलअधिकारी ( गावचावडी ऑफिस, कुरूंदवाड) — सदस्य
५) कृषी अधिकारी (पंचायत समिती, शिरोळ) — सदस्य
६) मा. तलाठी (गावचावडी ऑफिस, कुरूंदवाड) — सदस्य
७) मा.निरीक्षक (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, कोल्हापूर) — सदस्य (सचिव)

प्रस्तूत उपसमितीचा अभ्यास केला असता असे लक्षात आले की, तालुक्याच्या महसूल विभागातील अधिका—यांची निवड या समितीवर करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे यामध्ये समितीच्या कार्यवाहीवर सदस्य सचिवांची भूमिका महत्वाची आहे. संबंधित विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे प्राप्त झालेल्या जमीन विक्री प्रस्तावाच्या अनुषंगाने संबधित उपसमितीला प्रस्तावातील निवडलेल्या जमीनीचे निरीक्षण करून जिल्हा समितीकडे जमीन खरेदीसाठी शिफारस करतील असे निदर्शनात आले. हा प्रस्ताव सदस्य सचिवांकडून संबंधित गावाकडे माहितीची खात्री करून घेतली जाईल व त्यासाठी निरीक्षसकास संबंधीत गावातील ग्रामसेवक, तलाठी व सरपंच हे मदत करतील. त्याचप्रमाणे उपरोक्त यादी अंतीम केल्यानंतर उपसमितीने प्रस्तावित खरेदी करावयाच्या जमीनीचे प्रत्यक्षस्थळी निरीक्षण करून प्रास्तवित जमीन शेती करण्यास योग्य व पिकावू असल्याची खात्री करूनच जमीन हस्तांतरणास मान्यता दिली जाते. तसेच तो पाहणी अहवाल जिल्हा समितीकडे पाठवून 'जमीन खरेदी करावी' अथवा 'जमीन खरेदी करू नये' याबाबत कळविले जाते. यामध्ये उपसमीती पाठविलेल्या अहवालावरती विचार करूनच जिल्हा समिती निर्णय घेते व पुढील कार्यवाही केली जाते.

अशाप्रकारे सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये तालुकास्तरीय उपसमितीची भूमिका ही अग्रस्थानी असल्याचे आढळून आले. सदरची माहिती प्रत्यक्ष मुलाखतीव्दारे संकलित करण्यात आली. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजनेसंदर्भात कोल्हापूर जिल्हयामध्ये प्रस्तुत कालावधीमध्ये अंमलबजावणी करण्यात आली. यातून घडून आलेल्या सामाजिक बदलाची चर्चा पुढील प्रकरणात करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाचे सामाजिक न्यायमंत्री यांनी एका मुलाखतीमध्ये असे म्हटले आहे की, सदरची योजना ही 'अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रयरेषेखालील लोकांसाठी अत्यंत लाभदायक ठरलेली असून त्यांचा आर्थिक विकास साध्य होताना दिसत आहे. त्याचप्रमाणे भविष्यात एक ही कुटुंब दारिद्रयरेषेखाली राहणार नाही याची हमी सरकार कडून देण्यात येत आहे.' (संदर्भ — लोकराज्य मासिक, महाराष्ट्र शासन, ऑक्टो २००७, पान नं १९ ,२०)

**संशोधन पध्दती —**

सदरच्या लघु शोधप्रबंधाकरीता क्षेत्रिय सर्वेक्षण पध्दतीचा व ग्रंथालयीन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधने वापरण्यात आली. सदरहू योजनांच्या अंतर्गत कोल्हापूर जिल्हयामध्ये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली 'जिल्हा समिती' व शिरोळ तालुक्यामध्ये उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली 'तालुकास्तरीय समिती' स्थापन करण्यात आलेली आहे. या दोन्ही समित्यांकडून मिळालेली माहिती ही प्राथमिक स्वरूपात मिळविण्यात आली आहे. सदर योजनेच्या अभ्यासाकरीता पुढीलप्रमाणे दोन स्त्रोतांचा अवलंब करण्यात आलेला आहे.

सदर दोन्ही योजना या प्रस्तुत कालखंडात शिरोळ तालुक्यातील १६ गावांमध्ये राबविण्यात आल्याचे लक्षात आले. या १६ गावांमध्ये तब्बल ३३ लाभार्थ्यांना शेतजमीन मिळालेली आहे. तेव्हा त्यातील प्रमुख लाभार्थी गावांना भेट देवून लाभार्थ्यांकडून प्रत्यक्ष मुलाखत व निरीक्षणाव्दारे माहिती मिळविण्यात आली. तसेच 'जिल्हा स्तरीय' व 'तालुका स्तरीय' समित्यांच्या सदस्य अधिका—यांना भेटून प्रत्यक्ष मुलाखतीव्दारे माहिती संकलित करणेत आली.

सदर संशोधनाकरीता दुय्यम स्त्रोत म्हणून विषयांशी संबंधित संदर्भ ग्रंथ, शासकीय नियतकालिके, वर्तमानपत्रे, संकेतस्थळे इत्यादींच्या आधारे प्रस्तुत कालखंडातील माहिती संकलित करणेत आली. सदरहू संशोधनाकरीता दोन्ही योजनांची प्राथमिक व दुय्यम माहितीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

**शिरोळ तालुक्यातील सदर योजनेचा अभ्यास —**

**अ) प्रस्तावना :—**

सदरहू संशोधनाकरिता 'शिरोळ तालुक्यातील कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजना ; एक सामाजिक व राजकीय अभ्यास' (सन २००४ ते २०११)' या विषयाची निवड करण्यात आलेली होती. त्यामुळे महाराष्ट्र शासनाकडून सुरू केलेल्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजनेचा प्रशासकीय पातळीवरील कार्यवाहीचा अभ्यास म्हणून करण्यात आलेला आहे. सर्वसाधारणपणे राजकीय अभ्यासामध्ये शिरोळ तालुक्यामध्ये सन २००४ ते २०११ या कालावधीतील सदरहू योजनेचा प्रशासकीय पातळीवरील कार्यवाहीचा अभ्यास व त्यातुन झालेला विकास या भागामध्ये अभ्यासला गेलेला आहे. तसेच त्यामध्ये प्रशासकीय सुधारणा, सदर योजनेची शिरोळ तालुक्यातील अंमलबजावणी, सदर योजनेतील तरतूदींमध्ये झालेले बदल इत्यादी बाबींचा अभ्यास याच कालखंडामधील गृहीत धरून करणेत आलेला आहे.

तसेच सदरहू संशोधनाच्या सामाजिक अभ्यासामध्ये शिरोळ तालुक्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रयरेषेखालील लोकसंख्या, जातींची वर्गवारी, शासनाकडून मिळालेल्या शेतीचा प्रकार, शेतीविषयक ज्ञान, उत्पादन व उपभोग खर्च, कर्ज तसेच राजकीय सहभाग इत्यादी बाबींचा अभ्यास मागील तीन वर्षाच्या कालावधीतील बदल लक्षात घेवून करणेत येईल. त्याकरिता प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे.

**ब) सदरहू योजनेचा राजकीय अभ्यास —**

**भौगालिकदृष्टया शिरोळ तालुका —**

महाराष्ट्र राज्यात क्षेत्रफळदृष्टया कोल्हापूर जिल्हा २१ व्या क्रमांकावर असून लोकसंख्येनुसार ८ व्या क्रमांकावर आहे. कोल्हापूर जिल्हयाच्या एकूण ७६८५ चौ.कि.मी भौगोलिक क्षेत्रफळापैकी ५५४० चौ.कि.मी क्षेत्रफळ शेती व लागवडीखाली असून जंगलाचे ५५४० चौ.कि.मी आहे. कोल्हापूर जिल्हयात प्रामुख्याने ऊसाचे पीक असून ऊसाचे क्षेत्र ११५३.७१ चौ.कि.मी आहे. प्रशासकीयदृष्टया कोल्हापूर जिल्हा चार विभागातील १२ तालुक्यात विभागलेला आहे. करवीर

विभागात करवीर, पन्हाळा, शाहूवाडी व कागल चार तालुके, राधानगरी विभागामध्ये राधानगरी, भुदरगड, गगनबावडा, हे तालुके, गडहिंग्लज विभागांतर्गत, गडहिंग्लज, आजरा, चंदगड, इत्यादी तालुके व इंचलकरंजी विभागांतर्गत शिरोळ व हातकणंगले हे तालुके समाविष्ठ करण्यात आलेले आहेत. सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयात अनुसूचित जातीची लोकसंख्या ४.५० लाख असून ती एकूण लोकसंख्येच्या १३ टक्के इतकी आहे.

प्रशासकियदृष्टया शिरोळ तालुका कोल्हापूर जिल्हयातील इचलकरंजी विभागात येतो. शिरोळ तालुका भारतीय सर्वेक्षण विभागानुसार १६°४४' २६" उत्तर अक्षांस ते ७४°३५'९" पूर्व रेखांश यावरती वसलेला आहे. शिरोळ तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ ५०७ चौ.कि.मी इतकी आहे. शिरोळ तालुक्यात एकूण ५४ गावे आहेत. सन २००१ च्या जनगणनेनुसार शिरोळ तालुक्याची लोकसंख्या ३,५९,१७९ इतकी असून त्यामध्ये अनुसूचित जातीचे सरासरी प्रमाण १५ टक्के इतके राहिले आहे. तसेच शिरोळ तालुक्यात अनुसूचित जातीची दारिद्रयरेषेखालील २२७० इतकी सर्वाधिक कुटुंबे राहतात. त्यामध्ये केवळ १५: लोक हे साक्षर आहेत.

**सदरहू योजनेचा सामाजिक अभ्यास –**

मागील भागात सदरहू योजनेचा राजकीय अभ्यास करण्यात आलेला आहे. याभागामध्ये सामाजिक बदलाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. शिरोळ तालुक्यात एकूण ५४ गावे आहेत. त्यागावांमध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील दारिद्रयरेषेखालील २२७० इतकी कुटुंबे राहतात. या सर्व कुटुंबांचा अभ्यास करण्यास एकटया संशोधकास शक्य होत नाही म्हणून प्रस्तुत संशोधनात निवडलेल्या १६ गावात एकूण ३३ लाभार्थ्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. सर्वसाधारणपणे सामाजिक अभ्यासात कुटुंबांची लोकसंख्या, त्यांची शैक्षणिक स्थिती, आर्थिक स्थिती, जातींचा अभ्यास, कर्ज, उत्पन्न, शेतीचे उत्पादन उदरनिर्वाह, शेतीच्या मशागतीच्या पध्दती, सामाजिक वागणूक, आणि राजकीय सहभाग इत्यादी बाबींचा अभ्यास या भागात करण्यात आलेला आहे.

**तक्ता क्र. १**

| अ. नं | जिल्हा | तालुका | पाहणी केलेल्या गावांची संख्या | पाहणी केलेले एकूण कुटुंबे | जातवार कुटुंबांची वर्गवारी | | | | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | महार | मांग | चांभार | ढोर | नवबौध्द | |
| १ | कोल्हापूर | शिरोळ | १६ | ३३ | १७ | ७ | १० | निरंक | नरंक | ३३ |

**संदर्भ–विशेष समाजकल्याण विभाग, कोल्हापूर (२००४–२०११)**

सदर योजनेच्या 'जिल्हासमिती' बैठकीत जिल्हयाच्या लोकप्रतिनिधीच्या उपस्थितीमध्ये चिठठया काढून प्राप्त जमीनी वाटपासाठी लाभार्थ्यांची नावे निश्चित केली जातात व त्यांची वर्तमान पत्रामधून प्रसिध्दी दिली जाते. यातून पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना वाटप केलेल्या जमीनीची महसूली दस्तऐवजावर नोंद घेताना लाभार्थ्यांस भोगवटावदार वर्ग–२ म्हणून नोंदविली जाते.[५] कारण सर्वसाधारणपणे नोंदणी संदर्भात नियम असे की, भोगवाटादार वर्ग–१ करीता खाजगी मालकीच्या जमीनी, वर्ग –२ करीता शासनाच्या नियंत्रणात अटी घालून दिलेल्या जमीनी, तसेच भोगवटादार वर्ग–३ म्हणून इनामी जमीनी इत्यादी प्रकारच्या नोंदी शासकीय दप्तरात केली जाते. शासनाने ठरवून दिलेल्या भोगवटादार वर्ग –२ असलेल्या लाभार्थ्यांना प्राप्त जमीनी विकता येत नाहीत. म्हणूनसाठी खबरदारी शासनाकडून घेतल्याची लक्षात येते. प्रस्तुत कालावधीमध्ये शिरोळ तालूक्यात अनुसूचित जातीतील दारिद्रयरेषेखालील ३३ कुटुंबाना जवळपास २८ हेक्टर्स शेत जमीनीचे वाटप

शासनाकडून करण्यात आलेले आहे. त्यामध्ये ३२ लाभार्थ्यांना बागायत प्रकारची व एका कुटुंबाला जिरायत प्रकारची शेत जमीन शासनाकडून मिळालेली आहे.

वरील तक्त्यानुसार शिरोळ तालुक्यात एकूण १६ गावांमध्ये प्रामुख्याने कुरूंदवाड, तेरवाड, नांदणी, शिरढोण, दानवाड, चिंचवाड, सैनिकटाकळी, अर्जुनवाडा, घालवाड, धरणगुत्ती, अकीवाट, आलास, शिरटी, घोसरवाड, नवे दानवाड, कोथळी इत्यादी गावांना भेटी देवून माहिती संकलित करण्यात आली. त्यामध्ये संशोधनासाठी अनुसूचित जातीतील प्रमुख जाती म्हणून ओळखल्या जाणा—या महार, मांग व चांभार इत्यादी जातीतील कुटुंबांना भेट देवून प्रत्यक्ष पाहणीतून ही प्राथमिक स्वरुपाची माहिती संकलित करण्यात आली. यामध्ये संशोधनासाठी निवडलेल्या प्रस्तूत कालावधीमध्ये महार जातीतील कुटुंबांला या योजनेचा लाभ अधिक मिळल्याचे आढळून आले. त्यानंतर चांभार व मांग जातीतील कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला दिसून येतो.

तसेच प्रस्तुत कालखंडात कुरूंदवाड गावामध्ये सर्वाधिक एकूण ६ लाभार्थ्यांना शासनाकडून शेतजमीनीचे वाटप करण्यात आलेले आहे. त्यानंतर कुरुदवाड(६), नांदणी(५),तेरवाड (३) चिंचवाड(३), शिरढोण (२), अकिवाड (२), आलास (२), शिरटी (२), दानवाड (१), सैनिक टाकळी (१), अर्जुनवाड (१), घालवाड (१), धरणगुत्ती (१), घोसरवाड (१), नवे दानवाड (१), कोथळी (१) या गावांचा क्रम येतो. शासनाकडून देण्यात आलेल्या या शेतजमीनीमध्ये बागायत जमीनीचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास आले. जिरायत प्रकारची ४ एकर जमीन फक्त एकाच लाभार्थ्याला मिळाली आहे. सर्वसाधारणपणे इतर लाभार्थ्यांना जवळपास २ एकर बागायत जमीन वाटप करण्यात आलेली आहे. जमीनीचे क्षेत्र गट क्र इत्यादी संबंधी माहिती तक्ता क्र —१ मध्ये देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील अल्पभूधारक शेतक—यांसाठी पॉवर टिलर वाटप योजना सन २००८ पासून सुरु करण्यात आलेली आहे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील अल्पभूधारक शेतक—यांना सन २००८ पासून १०० टक्के अनुदानावर पॉवर टिलर पूरवठा करण्याची योजना महाराष्ट्र शासनाकडून सुरू करण्यात आली आहे. पॉवर टिलर हा शेती कसण्याकरीता लाभार्थ्याना दिला जातो. सदर योजनेचा शिरोळ तालुक्यातील अंमलबजावणी संबधीचा अभ्यास पुढील प्रमाणे केला गेला आहे.

तक्ता क्र.२

| वर्ष | लाभार्थी संख्या |
|---|---|
| सन २००८ | ३० |
| सन २००९ | ६६ |
| सन २०१० | १५६ |
| सन २०११ | निरंक |

(संदर्भ — सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, कोल्हापूर)

वरील माहिती ही कोल्हापूर जिल्हयातील असून त्यामध्ये शिरोळ तालुक्याची माहिती पुढील प्रमाणे अशी .

तक्ता क्र.३

| वर्ष | लाभार्थी संख्या |
|---|---|
| सन २००८ | निरंक |
| सन २००९ | ०८ |
| सन २०१० | १४ |
| सन २०११ | निरंक |

(संदर्भ — सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, कोल्हापूर)

**२.२ संशोधन विषयाची गृहीतके :—**

सदर संशोधन विषयाकरिता काही गृहीतके निश्चित केलेली आहेत. ती पुढील प्रमाणे.

१. सदर योजनेमुळे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रयरेषेखालील कुटुबाचे सबळीकरण होण्यास मदत झाली.
२. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रयरेषेखालील लोकांच्यामध्ये बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे.
३. सदर योजनेस लाभार्थ्यांचा म्हणावा तितका प्रतिसाद आढळून येत नाही. त्यांची संख्या वाढायला हवी होती परंतु ती कमी कमी होताना दिसते.
४. पॉवर टिलर योजना निधीअभावी हळूहळू होताना बंद दिसते.

**२.३ संशोधन विषयाची उदिद्ष्टये :—**

प्रस्तुत संशोधनासाठी 'शिरोळ तालुक्यातील कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजनाः एक सामाजिक राजकीय अभ्यास' (सन २००४ ते २०११) या विषयाची निवड करण्यात आलेली आहे. त्यामुळे शीर्षकाच्या सामाजिक व राजकीय अभ्यासाच्या अंगाने खालील प्रमाणे उद्दिष्टये निश्चित करण्यात आली आहेत.

१. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजना अंतर्गत लाभार्थी निवडीचा अभ्यास करणे.
२. शिरोळ तालुक्यातील सदरहू योजनेला मिळालेला प्रतिसाद व योजनेची यशस्वीता याचा अभ्यास करणे.
३. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजनेसंबंधी शासकीय धोरणाचा अभ्यास करणे.
४. शिरोळ तालुक्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लाभार्थी कुंटुंबांतील सामाजिक बदलांचा अभ्यास करणे.

वरील उदिद्ष्टांच्या पूर्ततेसाठी आवश्यक ते संशोधन करण्यात आले असून यातून निश्चित निष्कर्ष ही काढण्यात आलेले आहेत. याची मांडणी पुढे करण्यात आलेली आहे.

**कर्मवीर दादसाहेब गायकवाड सबळीकरण योजनेतून सबळ आणि सक्षम झालेली कुटूंबे —**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजनेव्दारे शासनाकडून शेत जमीन मिळवून त्यावर सबळ आणि सक्षम झालेल्या काही कुटुंबांची उदाहरणे अधिक स्पष्टीकरणासाठी या ठिकाणी दिलेली आहेत. जगण्यासाठी मिळेल तो रोजगार करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत असलेल्या आण्णाप्पा नागाप्पा शिंदे यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाव्दारे या योजनेचा लाभ घेवून आपल्या आयुष्याला एक नवीन दिशा दिली आहे. आण्णाप्पा शिंदे हे शिरोळ तालुक्यातील सैनिक टाकळी येथील रहिवाशी आहेत. शासनाकडून शेतजमीन मिळण्यापूर्वी शिंदे यांची कौटुंबिक स्थिती फारच हालाखिची होती. अत्यंत गरिबीत जीवन जगणा—या या कुटुंबात मंडळी अधिक होती. त्याचे दोन मूले, आई — वडील व स्वतः पती—पत्नी असे मिळून ६ जणांचे कुटुंब त्यामध्ये मुलगी पदवीचे शिक्षण घेत होती व मुलगा १० वी शिकत असताना कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवणे शिंदे यांना अतिशय कठिण जात होते. अशा परिस्थितीत शिंदे यांनी सदर योजनेकरिता या विभागाकडे अर्ज केला व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून सन २००९ —१० मध्ये २ एकर बागायत जमीन मिळवून घेतली. त्याचबरोबर त्यांना शेती कसण्यास पॉवर टिलर ही मिळाला. त्याव्दारे त्यांनी ऊस, ज्वारी, भूईमूग

इत्यादी पीकांची उत्पादने घेतली. त्यातून त्यांनी वर्षाकाठी २० ते ३० हजार रूपयांचे उत्पन्नही मिळवले ज्वारीचे पीक निघाल्यानंतर एका एकरात ऊसाची लागवड केली. बाकीच्या शेतात भुईमूग, हरभरा इत्यादी पीके घेतली. नगदी पीके कांदा घेवून त्यांची ३० हजारांचे उत्पन्न मिळविले. शिंदे कुटुंबाला कृषी विभागाने बी–बियाणे, शेती अवजारे, पॉवर टिलर योजनेतून पॉवर टिलर व इतर साहित्य मिळविले. या योजनांचा लाभ मिळवून शिंदे यांनी घर दूरूस्तीचे काम केले तसेच मुलींला उच्च शिक्षण शिकविण्याचे इच्छा ही व्यक्त केली. दररोज मोल मजूरी करून त्यांना १०० रू मिळायचे सध्या ते स्वत: शेतीकरून वर्षाकाठी ५० ते ६० हजार रूपयांचे उत्पन्न मिळवत आहेत. यातून ते समाधानी जीवन जगताना दिसत आहेत.

आणखी एक उदाहरण घ्यायचे झाले तर पारंपरिक पध्दतीने चप्पलाचा व्यवसाय करून आपले व कुटुंबाचे पोट भरण्याचे काम करताना चर्मकार समाजातून दशरथ राऊ माने यांना जगणे मुश्कील झाले होते. सन २००९ मध्ये माने यांनी शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून ७६ गुंठे बागायती शेत जमीन मिळवली दशरथ राऊ माने हे शिरोळ तालुक्यातील हेरवाड येथील रहिवाशी आहे. त्याचप्रमाणे शेती कसण्यासाठी शासनाकडून त्यांना पॉवर टिलर ही देण्यात आलेला आहे. त्यातून त्यांनी प्रतिवर्षी ४० टन ऊसाचे उत्पन्न घेतात. ऊसाच्या पीकाबरोबरच ज्वारी, बाजरी, भूईमूग यांचीही ते उत्पादन घेतात. त्यांना दोन मुले आहेत. त्यांचे शिक्षण दहावी पर्यंत झालेले आहे. त्यांचे कुटुंब मोठे असल्याने सर्वजण मिळून एकत्र शेत करतात व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितात. शेतीच्या उत्पादनातून वर्षाकाठी ५० ते ६० हजार रूपयांचे उत्पादन घेतात. शेतीसाठी त्यांना शासनाच्या तालुका कृषी विभागाकडून अन्य मदत दिली जाते. यातून ते समाधानी जीवन जगताना दिसतात. अशा प्रकारे महाराष्ट्र शासनाकडून सुरू करण्यात आलेली 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजना' अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील दारिद्रयरेषेखालील लोकांसाठी लाभदायक ठरताना दिसत आहे.

**निष्कर्ष –**

सदर संशोधन विषयानूसार प्राथमिक आणि दुय्यम माहितीच्या आधारावरुन शिरोळ तालुक्यातील 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजना' व 'पॉवर टिलर वाटप योजना' या दोन्हीं योजनांच्या अनुशंगाने लाभार्थी घटकाचा अभ्यास केल्यानंतर तसेच जाणकारांचे विचार पडताळून समजून घेतल्यानंतर खालील प्रमुख निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

**अ) लाभार्थी कुटुबांची सर्वसाधारण स्थिती –**

१) एकत्र कुटूंब पध्दतीशी एकूण शेतकऱ्यांचे प्रमाण कमी आहे तर विभक्त कुटूंब पध्दतीशी जास्त आहे.

२) लाभार्थी कुटूंबांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे.

३) व्यक्तीगत आर्थिक लाभामुळे विकल्या गेलेल्या पॉवर टिलर यंत्राचा विचार करुन सदरहू योजनेचे स्वरुप बदलून मिनी ट्रॅक्टर देण्याची योजना शासनाच्या विचारधीन आहे.

४) लाभार्थी कुटूंबाकडून शेती बरोबर पशुपालन हा दुय्यम व्यवसाय करण्याला चालना मिळत आहे.

५) बहुतांश लाभार्थी हे पॉवर टिलर यंत्रापासून वंचित आहेत.

**ब) प्रशासकीय कार्यपध्दती –**

१) शासकीय योजनांच्या यशस्वीतेमध्ये दिरंगाई होताना दिसते.

२) लाभार्थी निवडीमध्ये कमी स्पष्टता आढळते.

३) सदरहू योजनांसंबंधी शासनाने जास्तीत जास्त आर्थिक तरतूद करावी.

४) पॉवर टिलर योजना निधीअभावी बंद पडताना दिसत आहे.
५) कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेसंदर्भात कोल्हापूर जिल्हयामध्ये शासनाचे धोरण हे एकांगी वाटते.
६) पॉवर टिलर योजनेसंदर्भात प्रशासकीय सुधारणा करणे आवश्यक आहे.

**महत्त्वाच्या सूचना व शिफारशी –**

शिरोळ तालुक्यातील कर्मवीर दादासाहेब गायकवाड व सबळीकरण व स्वाभीमान योजना व पॉवर टिलर योजना यांच्या संदर्भात सर्वसमावेशक स्थितीच्या अभ्यासातून दिसून येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी महत्वाच्या सूचना सुचविण्यात आलेल्या आहेत. त्यांच्यातील प्रमुख शिफारशी आणि सूचना या जमिनीचा योग्य वापर, पीक पध्दती, उत्पन्नातील वाढ, योजनांची प्रभावी अंमलबजावणी, नवीन तंत्राचा योग्य वापर इत्यादींवर आधारित आहेत. त्यामुळे वरिल संदर्भ लक्षात घेता खालील प्रमुख विभागामध्ये विशेष उपाययोजना करणे तात्काळ गरजेचे आहे.

**अ) प्रशासकीय यंत्रणा –**

सदरहू लघुशोध प्रबंधाकरिता महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना' व 'पॉवर टिलर वाटप योजना' या दोन्ही योजना सदर संशोधन विषयाकरिता निवडण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सदरच्या दोन्हीं योजनांसाठी म्हणून प्रशासकीय पातळीवरील सुधारणा या ठिकाणी सुचविण्यात आलेल्या आहेत. यासाठी काही सुचना या अभ्यासाअंती करण्यात आलेल्या आहेत.

**त्या पुढीलप्रमाणे –**

१) शासनाने या घटकातील शेतकऱ्यांना शेतीसह अन्य दुय्यम व्यवसायाला प्रोत्साहित करण्यासाठी आवश्यक ती मदत पुरवण्याचा प्रयत्न करावा.
२) अनुसूचित जाती व नवबौध्दघटकातील अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी असणारी १०० टक्के अनुदानावर पॉवर टिलर वाटप योजना ही अनुदाना अभावी शासनाने बंद केली असून ती पूर्ववत सुरू करावी.
३) सदरहू योजनांमध्ये पारदर्शी कारभार आणण्यासाठी ई गव्हर्नन्स च्या माध्यमातून शासकीय योजनांसंबंधी सर्व कामे पारदर्शी पध्दतीने केली जावीत.

**ब) लाभार्थी शेतकऱ्यांसाठी शेतीशी संबधीत सूचना –**

सदरहू योजनांसाठी लाभार्थी गट म्हणून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची निवड शासनाने केलेली आहे. त्यामुळे या घटकाचा सामाजिक अभ्यास या विषयांतर्गत करणेत आलेला आहे. म्हणून हया लाभार्थी कुटुंबांना घटकासंबंधी सूचना सूचविण्याचा प्रयत्न याठिकाणी केला आहे.

१) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लाभार्थ्यांनी श्शेतीची मशागत शास्त्रीय पध्दतीने करून कमीत कमी कालावधीमध्ये जास्तीतजास्त उत्पादन मिळवून देणाऱ्या पिकांची लागवड करावी.
२) पीक पध्दतीचा अवलंब लाभार्थी शेतकऱ्यांनी विशिष्ट हंगामानुसार केला पाहिजे.
३) आधुनिक प्रकारच्या शेतीसाठी शेतकऱ्यांनी पाण्याचा वापर ठिबक व तुषार सिंचन पध्दतीने करावा.
४) माती तपासणी व पेरणीच्या वेळी जमिनीत असणारा ओलावा विचारात घेऊन पिकांना खतांची मात्रा देऊन अधिक उत्पन्न घेण्याचा प्रयत्न करावा.

**समारोप –(नवीन अपेक्षा)**

सदरहू लघुशोध प्रबंधाकरिता निवडण्यात आलेल्या विषयाचा अनुशंगाने अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान योजना व पॉवर टिलर योजना' या दोन्ही योजना अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रयरेषेखालील लोकांकरिता अत्यंत फायदेशीर ठरताना दिसत आहेत. त्यामुळे या योजनांकरिता शासनाकडून भरीव आर्थिक तरतुद करून या घटकांतील सर्वांना शेतीच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध देवून महाराष्ट्राचा सर्वांगिण विकास करुन दाखवावा. अशी अपेक्षा आहे. त्यासाठी शासन आपल्या पातळीवर प्रयत्नशील राहीलच परंतू त्याचबरोबर प्रगल्भ राजकीय व सामाजिक नेतृत्व, जागृत कार्यकर्ते मात्र हवेत. तरच हया योजनांची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकेल. दरम्यान, ७३ व्या घटनादुरूस्तीने तर देशात क्रांती केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाना अधिकतम कायदेशीर अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यामुळे योजनांच्या यशस्वीतेला अधिक पाठबळ लाभणार आहे. संशोधनाअभावी या घटकाकरिता असणाऱ्या अनेक योजना शासनाला प्रभावीपणे राबविता येत नाहीत व या घटकाच्या विकासाला खिळ बसते. त्यामुळे हा घटक पुन्हा दारिद्रयात जीवन जगताना दिसतो. या योजनांच्या यशस्वीतेसाठी जागृत जनता हाच मोठा आधार ठरणार आहे. अशा प्रकारच्या योजना राबवून या घटकाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी या घटकातील लोकांचा रोजगाराचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे. या नैसर्गिक साधन सामुग्रीचा अनमोल ठेवा भावी पिढयांचा विचार करून जपून वापरावा हे या घटकातील लोकांचे आद्य कर्तव्य होय. त्यातूनच हा घटक आर्थिकदृष्टया सबल होऊन स्वाभिमानाने व ताठमानाने जीवन जगू शकेल. या संशोधनातून दिलेल्या सूचना लक्षात घेऊन योग्य दिशेने प्रयत्न केल्यास शासकीय योजनांसंबंधी भेडसावणाऱ्या समस्या लवकरात लवकर नाहीशा होतील व योजना यशस्वी होण्यास निश्चित मदत होईल.

प्रस्तुत लघुशोध प्रबंधाकरिता 'शिरोळ तालुक्यातील कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनाः एक सामाजिक व राजकीय अभ्यास' (सन २००४ ते २०११) हया विषयांतर्गत केलेल्या संशोधनातून शिरोळ तालुक्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लाभार्थ्यांच्या समाजबदलाचा अभ्यास याठिकाणी करणेत आला आहे. यातून या समाजाचा विकासच होताना दिसतो आहे. सध्या मुद्रांकशुल्क वाचविण्यासाठी शासन धोरणात बदल करून नवीन धोरण आणू पाहत आहे. वस्तूतः जमिनीची बाजारातील किंमत त्यापेक्षा किमान चार—पाच पट अधिक असते. त्यासाठी शासनाने अधिक चांगला प्रयत्न करून लाभार्थ्यांना जमिनी बाजारभावाने खरेदी करण्याचा मार्ग खुला करून दिला पाहिजे. तरच ते योग्य ठरेल अन्यथा एक चांगली व मुळातून परिवर्तन घडविणारी योजना बंद पडल्याचे पातक सरकारच्या माथी येईल, एवढे नक्की. तसेच सदर योजनांचा लाभ घेऊन या घटकाने सबल सक्रिय व्हावे. तरच डॉ. बाबासाहेब आंबडेकर व कर्मवीर दादासाहेब गायकवाड या महान विभूतींच्या कार्याला, लढयास यश आले असे म्हणता येईल. प्रगल्भ राजकीय व सामाजिक नेवृत्वासह कार्यकर्ते जागृत हावेत ही योजना ख—या अर्थाने मोठा आधार ठरणार आहे. संशोधकाने सुचविलेल्या मार्गाने लाभार्थीनी प्रयत्न केल्यास त्यांचा विकास होण्यास नक्कीच मदत होईल. त्याचप्रमाणे प्रशासनानेही संशोधकाने सुचविल्याप्रमाणे सध्याच्या सुशासनाच्या युगामध्ये लोकसहभागाचा अवलंब केल्यास हया योजना लोंकापर्यत पोहचतील

**संदर्भ सूची**


१) फडकुले निर्मलकुमार (संपा.), २०१० कर्मवीर दादासाहेब गायकवाड कार्य आणि कर्तृत्व', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पान. नं. १५८,१५९.

२) उपरोक्त पान नं १४५

३) विभूते भालबा, २००९ भारताचे संविधान', मनोविकास प्रकाशन, पुणे. पानं नं. ५७

४) कुंभार नागोराव. २००७ आरक्षण का व कसे?', प्रबोधन प्रकाशन, लातूर. पान नं. ६६

५) भोळे भा.ल., २००३ भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर. पान नं. ९०

६) बाळ प्रकाश व बेडकीहाळ, २००२ 'भारतीय राजकीय व्यवस्था प्रक्रिया आणि स्वरुप', आंबेडकर अकादमी , सातारा. पान नं. १४

७) भावटेकर मो,वि २००७ 'राजहंस व्यवहारीक मराठी शब्दकोश', राजहंस प्रकाशन पुणे. पान नं ४७१

८) चोपडे किसन, २०१० महाराष्ट्राचे शिल्पकार विनोबा भावे', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि

९) रायरीकर व सुरनीस श्रीनिवास २००७श आमचे मुख्यमंत्री ', पृथ्वी प्रकाशन मुंबइ

१० ) थोरात सुखदेव,२०१२ : ष्दलित निरंतर विषमता आणि दारिद्रयष , सुगावा प्रकाशन पुणे, पान नं. १४५, १४६

११) शासननिर्णय (२ जून २००४); सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन.

१२) वाटचाल (विशेषांक); सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, पान नं
३३

१३) कोल्हापूर जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन सन २००४ पानं नं ६

१४) खेर सी.पं, २०१०; श्दारिद्रयाची संकल्पना आणि निवारण', दिलीपराज प्रकाशन, पुणे. पान
नं १०

१५) सिंह बामेश्वर, २००६, श्लोकप्रशासन (सिध्दांत और व्यवहार)', राधा पब्लिकेशन, नई दिल्ली. पान नं ३५६,३५७

१६) पळशीकर व बिरमल, २०१० य महाराष्ट्राचे राजकारण राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पूणे. पान नं ७६,७७

१७) कीर धनंजय, १९८९; डॉ बाबासाहेब आंबेडकर', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. पान नं ४६.